[1][प्रकरण ११-ब

# स्थानिक संस्था कराच्या संबंधातील तरतुदी

**१५२प. स्थानिक संस्था कर बसविणे.**

या प्रकरणाच्या व नियमांच्या तरतुदींच्या अधीनतेने या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, ज्या महानगरपालिकांना कलम १२७ च्या पोटकलम (२) च्या खंड (अअअ) च्या तरतुदी लागू होतात, त्या महानगरपालिकेला उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी त्या शहराच्या हद्दीमध्ये होणाऱ्या, राज्य शासनाने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट केलेल्या मालाच्या प्रवेशावर, अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने, स्थानिक संस्था कर बसविता येईल व तो गोळा करता येईल.

**१५२क्यू. विवक्षित माल स्थानिक संस्था कर बसविण्यास पात्र नसणे.**

राज्य शासनास, याबाबतीतील आयुक्तांचा प्रस्ताव विचारात घेतल्यावर, आणि **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, मालाचे जे विविध प्रवर्ग कोणताही स्थानिक संस्था कर बसविण्यायोग्य नसतील ते प्रवर्ग विनिर्दिष्ट करता येतील.

**१५२र. प्रकरण अकरा-अ च्या विवक्षित तरतुदी लागू असणे.**

प्रकरण अकरा-क च्या कलम १५२ब, १५२ड, १५२ई, १५२फ, १५२ग, १५२आय, १५२ज, १५२क, १५२ल, १५२म, १५२न व १५२ ओ यांच्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, या प्रकरणाखालील स्थानिक संस्था कर बसविण्यास व गोळा करण्यास लागू होतील.

**१५२स. व्यापाऱ्यांचे निर्धारण करणे.**

आयुक्तास, ज्या अधिनियमान्वये स्थानिक संस्था कर बसविण्याच्या, तो गोळा करण्याच्या व वसूल करण्याच्या प्रयोजनार्थ, विहित करण्यात येईल अशा कालावधीसाठी व अशा रीतीने, अशा व्यापाऱ्यांचे निर्धारण करता येईल.

**१५२ट. या प्रकरणाच्या प्रयोजनांनी नियम करण्याचे राज्यशासनाचे अधिकार.**

(१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या प्रकरणाची प्रयोजने

---

१. सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७ द्वारे प्रकरण ११-ब समाविष्ट केले. (३१.८.२००९ पासून)

पार पाडण्यासाठी नियम तयार करता येतील.

(२) या कलमान्वये केलेले सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तींस अधीन असतील.

(३) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे एक अधिवेशन किंवा लागोपाठची दोन अधिवेशने मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता अधिवेशन चालू असताना राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील व असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून, यथास्थिति, केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अमलात येईल किंवा तो नियम अमलात येणार नाही, तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]